संं.फौ.ख.क्र. १३४१/२०२३
नवनिर्माण विरुध्द जितेंद्र
निशाणी क्र.१३

<u>सरतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री. मेटकर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –

०६. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे, शपथपत्र **निशाणी क्र. १३** वर आहे.

०७. तसेच मी माझ्या पुराव्यामध्ये आरोपीने दिलेला रुपये १,५६,९७८/– चा धनादेश दाखल केला आहे. आता मला तो धनादेश दाखवीण्यात आला आहे हा तोच असून त्यावरची सही आरोपीची आहे. तो धनादेश त्याने आमच्या संस्थेला कर्जाच्या परतफेडीकरीता दिला होता. धनादेशास **निशाणी क्र.२०** देण्यात येतो.

०८. तो धनादेश अनादरीत झाल्याबाबत मला संबंधीत बॅकेद्वारे मेमो दिला होता. तो मेमो मी दाखल केले आहे. आता मला ते मेमो दाखवीण्यात आले हे तेच आहेत. त्यावर बॅंकेच्या व संबंधीत अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. मेमोला **निशाणी क्र. २१** देण्यात येतो.

०९. धनादेश अनादरीत झाल्याबाबत मी आरोपीला पाठवीलेली नोटीसची स्थळप्रत मी दाखल केली आहे. आता मला स्थळप्रत दाखवीण्यात आली. ही तीच आहे. त्यातील मजकुर खरा असून तो मुळ नोटीसप्रमाणे आहे. त्यावर माझे विधीज्ञांची सही आहे. स्थळप्रतीस **निशाणी क्र २२** देण्यात आला.

१०. सदरची नोटीस आरोपीला पाठविल्याबाबत तसेच मिळाल्याबाबत मला डाक विभागातर्फे पावती व पोच पावती प्राप्त झाली आहे. ती मी प्रकरणात दाखल केली आहे. आता मला पावती व पोच पावती दाखवीण्यात आली. ह्या त्याच

आहे. पावतीस व पोच पावतीस अनुक्रमे **निशाणी क्र. २३ व २४** देण्यात येते.

११. मी माझ्या पुराव्यामध्ये आमच्या संस्थेने मला संस्थेतर्फे बाजु मांडण्यासाठी घेतलेल्या ठरावाची सत्यप्रत मी सादर केली आहे. आता मला त्या ठरावाची प्रत दाखविली ही तिच आहे. यावर आमच्या संस्थेच्या अध्यक्ष, सरव्यवस्थापक यांची सही असून संस्थेचा शिक्का आहे. ठरावाच्या सत्य प्रतिला **निशाणी क्र.२५** देण्यात आला.

सरतपास संपूर्ण

**उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री माहेश्वरी गैरहजर, आरोपीने त्याला स्वतः उलटतपास घेण्याची ईच्छा दर्शवली. करीता उलटतपास आरोपीतर्फे स्वतः मार्फत सुरु.**

१२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला तो धनादेश दिलाच नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने धनादेश संस्थेला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कर्ज प्रकरण करतेवेळी तो कोरा धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ पासून आरोपीने आमच्या संस्थेशी कोणताही व्यवहार केलेला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आरोपीने दिनांक ०१.०३.२०१६ रोजी रु.१,१४१/– जमा केल्याचे नोंद आहे. आरोपीने दैनंदिन जमा करण्यासाठी वेगळे खाते आमच्या संस्थेत उघडले आहे. त्यामध्ये आरोपीने वेगळी रक्कम जमा केली आहे. आरोपीला कर्जाची रक्कम धनादेशाद्वारे दिली होती. ती रक्कम आरोपीच्या खात्यात जमा झाली होती. मला त्याचा खाते क्रमांक सांगता येणार नाही. मी अभिलेख बघुन सांगू शकतो की, ती रक्कम आरोपीचे खाते क्रमांक ६०२७ मध्ये

**सं.फौ.ख.क्र. १३४१/२०२३**
**नवनिर्माण विरुध्द जितेंद्र**
**निशाणी क्र.१३**

दिनांक ०१.०६.२०१५ रोजी जमा झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही रक्कम आरोपीच्या खात्यात जमाच झाली नाही.

**उलटतपास संपूर्ण.** **फेर तपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

( स.र.भरड )

दिनांक २२/११/२०२४ **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

सावनेर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D. F. File of Evidence is word to word as per original Evidence."

Name of Stenographer : S. A. Misal